लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३३ वा | बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# बदलापूर प्रकरणाच्या तपासासाठी SIT स्थापन

## खटला फास्ट ट्रॅक कोर्टात, उज्वल निकम लढणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** बदलापूर मधील एका नामांकित शाळेत साडेतीन वर्षाच्या दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.आणखी धक्कादायक बाब म्हणजे याबाबतची तक्रार देण्यासाठी मुलींचे कुटुंबीय बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गेल्यानंतर त्यांना गुन्हा दाखल होण्यासाठी तब्बल १२ तास ताटकळत ठेवण्यात आलं. त्यामुळे पोलिसांच्या कारभाराबाबत संताप व्यक्त होतोय. आज सकाळपासून बदलापूर परिसरात आंदोलन सुरु आहेत. अशातच शिंदे सरकारने जनतेचा रोष पाहत तातडीने प्रकरणात गांभीर्याने लक्ष घेतले आहे. (पान 2 वर..)





### सीएम शिंदे यांचे बदलापूर अत्याचार प्रकरणावर ट्वीट

बदलापूरमध्ये एका शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची अतिशय गंभीर दखल मुख्यमंत्री यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. सखी सावित्री समित्या शाळांमध्ये स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाय योजना करण्याचे सीएम शिंदे यांनी सांगितले आहे.




# आज भारत बंदची हाक

## काय बंद आणि काय राहणार सुरू?

**मुंबई (कटूसत्य वृत्त ):-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आरक्षण आणि क्रीमी लेयरबाबत सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आहे. या निर्णयाला आरक्षण बचाओ संघर्ष समितीकडून तीव्र विरोध केला जात असून अनेक संघटनांकडून आज म्हणजेच २१ ऑगस्टला भारत बंदची हाक देण्यात आली आहे. त्यानंतर आज सार्वजनिक वाहतूक आणि खासगी संस्था बंद राहणार आहेत. राज्यांना एससी आणि एसटी गटांमध्ये वर्गीकरण करण्याची परवानगी देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाला आहे. या निर्णयामागे सर्वाधिक



गरजूंना आरक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे, मात्र विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी याला कडाडून विरोध केला आहे. या भारत बंदला राजस्थानमधील एससी/एसटी समुदायांनी पाठिंबा मिळाला आहे. भारत बंदला देशभरातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळू शकतो. तसेच आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मायावतींच्या बहुजन समाज पक्षाने भारत बंदला पाठिंबा दिला आहे. कार्यकर्त्यांना बंदमध्ये सहभागी होऊन शांतता राखण्याचे आवाहन पक्षाकडून करण्यात आलं आहे. राजस्थानातील जवळपास सर्व एससी/एसटी प्रवर्गातील नागरिकांनी या बंदला पाठिंबा दिला आहे.या बंदमध्ये रुग्णवाहिका, रुग्णालये, मेडिकलसारख्या आपत्कालीन सेवा सुरू राहतील.

### काय बंद राहील आणि काय उघडे राहील?

या बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने देशभरात संवेदनशील समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सुरक्षा वाढवली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (पान 2 वर..)

# महाजनांची पाठ फिरताच पोलीस आक्रमक

## दुसऱ्यांदा जोरदार लाठीचार्ज करत आंदोलन मोडीत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** बदलापूरच्या एका नामांकित शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट पसरली आहे. आरोपीला फाशी देण्यात यावी या मागणीसाठी गेल्या ८ तासांपासून नागरिक बदलापूर रेल्वे स्टेशनवर आंदोलन करण्यात आले.

समोर आलेल्या माहितीनुसार, बदलापूर रेल्वे स्टेशनवर हजारो आंदोलक आरोपीला फाशी द्या या मागणीसाठी आंदोलन करत होते. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांकडून पुन्हा एकदा लाठीचार्ज करण्यात आला आहे.

बदलापूर रेल्वे स्टेशनवर हजारो आंदोलक आरोपीला फाशी द्या या मागणीसाठी आंदोलन करत होते. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांकडून पुन्हा एकदा लाठीचार्ज करण्यात आला आहे. आंदोलकांनी हे आंदोलन



### नेमकं काय घडलं?

बदलापूरमध्ये अवघ्या चार आणि सहा वर्षांच्या दोन चिमुकल्या मुलींवर शाळेच्या स्वच्छतागृहात अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधित संस्था ही बदलापूरमधील नामांकित शाळा आहे. येथील एका सफाई कर्मचाऱ्याने काही दिवसांच्या अंतराने दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पालक आणि बदलापूरमधील नागरिक प्रचंड संतापले आहेत. बदलापूर बंदची हाक देण्यात आली असून नागरिकांचा मोर्चा शाळेच्या गेटवर जाऊन धडकला आहे.

मागे घ्यावा यासाठी राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनीही प्रयत्न केला होता.

तब्बल एक तास आंदोलकांशी चर्चा करत होते मात्र आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते.

त्यामुळे सायंकाळी 6 च्या सुमारास बदलापूर रेल्वे स्टेशनवर आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि आंदोलकांना पांगवलं. नंतर पोलिसांकडून आंदोलकांची धरपकड करण्यात येत अली.

तर दुसरीकडे बदलापूर प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्यात आली आहे अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

तसेच सरकारने या प्रकरणात पहिली कारवाई करत गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या तीन पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यलयाकडून देण्यात आली आहे.

# दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातून काँग्रेसकडून धनगर समाजालाच उमेदवारी मिळण्याची आग्रहाची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यात सध्या धनगर समाजाची लोकसंख्या ही सुमारे दोन कोटी इतकी आहे परंतु आज महाराष्ट्रातून काँग्रेस पक्षाचा धनगर समाजातील एकही आमदार नाही. काँग्रेस पक्षाकडून या समाजास जनगणनेच्या अहवालानुसार संपूर्ण महाराष्ट्रातून जात निहाय जनगणनेनुसार धनगर समाजास विधानसभेचे तिकिट देण्यात यावे.

सध्या महाराष्ट्र राज्यात ३५७ तालुके असून यापैकी १५० तालुक्यात धनगर समाज हा बहुसंख्येने आहे. तरी त्या त्या तालुक्यात धनगर समाजास विधानसभेसाठी काँग्रेस आय पक्षाकडून एकूण ७८ मतदार संघात सर्व्हेनुसार तिकिट देण्यात



यावे. सध्या २५१, दक्षिण सोलापूर मतदार संघात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे ९०,००० एवढी आहे.

सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुका, पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ तालुका, करमाळा तालुका, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट तालुका, उत्तर सोलापूर व माढा तालुका येथे धनगर समाज हा बहुसंख्येने असून देखील धनगर समाजास विधानसभेचे तिकिट देताना दरवेळी डावलले जाते. यामुळे धनगर समाजात असंतोष पसरला आहे. कै. आनंदराव देवकते साहेब (माजी कॅबिनेट मंत्री) यांनी काँग्रेस पक्षासाठी फार मोठा त्याग केला असून स्वतःचा वैयक्तिक स्वार्थ न साधता एका क्षणात त्यांनी राजीनामा देऊन फार मोठा त्याग केला आहे. देवकते साहेब यांचे नेतृत्व सर्व समाजाचे लोक मानत होते व ते सर्व समाजातील लोकांना बरोबर घेऊन जात होते. तेव्हापासून आजतागायत जवळ जवळ २० वर्षापासून दक्षिण सोलापूर मतदार संघास धनगर समाजास आमदारकीपासून वंचित ठेवण्यात आले आहे ही अतिशय खेदाची बाब आहे. तरी येत्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघातून धनगर समाजासच उमेदवारी देण्यात यावी अशी आमची आग्रही मागणी आहे.

जर येत्या विधानसभा निवडणुकीत धनगर समाजास विधानसभेत तिकिट दिले गेले नाही तर विधानसभा (पान 2 वर..)

स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड
बहुउद्देशिय व संशोधन संस्था
संचलित
मोहोळ शहरातील पहिली आधुनिक अभ्यासिका
* वैशिष्ट्ये *
• वातानुकूलित सुसज्ज इमारत व प्रसन्न वातावरण
• मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था
• आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प
• प्रदुषणमुक्त वातावरण
• स्वतंत्र प्रसाधनगृह
• वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन
• शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
• दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
• प्रत्येक जागा आरक्षित
• मर्यादित प्रवेश क्षमता
• वाहन तळाची सोय
• दि. १६ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
• लॅपटॉप व मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट
• अभ्यासिकेत नोंदणी करणाऱ्या प्रथम १० विद्यार्थ्यांना शुल्कात १०% सूट
• संपर्कासाठी पत्ता •
बी.एन. गुंड कॉम्प्लेक्स, सोलापूर रस्ता, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
अभ्यासिकेची वेळ : स. ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत
मो. नं. 7038864753 / 9226517873

After 10th & 12th
Hotel Management
BOOK YOUR SEAT NOW
Limited Seats...Hurry
Diploma - Govt Approved Two Year Course
Degree - UGC Approved Three Year Course
ADMISSION STARTED 2024-25
Be All rounder
Be Executive Chef,
Be General Manager,
Be Executive Engineer,
Be Account Manager
Be Best Bar Tender
Be F & B Manager
with Only One Course
100% JOB Guaranty
Earn & Learn
• With 2+ Years Experience
• Earn 10000+ Per Month
• Education loan @ 0 %
• Scholorship for Boys/Girls
• Foreign Languages
• 100+ Practicals
• Visits/Five Star Hotels/Wineries
INDEX
College of Hotel Management
Visit
Prime Point building, beside bharat petrol pump, shewalwadi phata, hadapsar, pune -411037
Web-www.iindexhospitality.com
9970667166, 9970669566

## संपादकीय

# उत्पादन क्षेत्रात गती हवी!

भारतात देशांतर्गत बाजारपेठ मोठी आहे. तसेच अगणित मजूर आपल्याकडे आहेत. मात्र, भारत गेल्या तीन दशकांत अनेक देशांच्या तुलनेत खूप मागे राहिला आहे. 2047 पर्यंत समृद्ध भारताच्या दिशेने वाटचाल करण्याचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समोर ठेवले आहे. त्यासाठी देशातील शेतीवरील भार कमी होऊन उद्योगधंदे वाढले पाहिजेत आणि शेतीतील काम करणार्यांचा भार उद्योग क्षेत्राकडे वळला पाहिजे. उद्योगगंगा ग्रामीण भागातही पोहोचली पाहिजे; परंतु या संदभार्तील ताजी आकडेवारी मात्र निराशाजनक आहे. आयआयपी म्हणजेच भारताचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक जून महिन्यात 4.2 टक्क्यांवर आला असून, जानेवारी 2024 पासूनचा हा नीचांक म्हणता येईल, असा हा आकडा आहे. याचे कारण, वीज आणि खाणकाम क्षेत्रांनी चांगली कामगिरी करूनही निर्मिती क्षेत्राच्या गतिमंदतेने आयआयपी अतिशय खाली आला आहे. आधीच्या मे महिन्यात तो 6.2 टक्के होता. आयआयपीमध्ये मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे उत्पादनाचा वाटा किंवा भारांक 77 टक्के इतका आहे. कारखाना क्षेत्रातील उत्पादनाचा वेग संथ होणे हे निरोगी अर्थव्यवस्थेचे लक्षण मानता येणार नाही. उत्पादन क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल मशिनरी, धातू आणि वाहतूक क्षेत्र यांची प्रगती समाधानकारक आहे. परंतु सार्वत्रिक निवडणुका आणि त्यांचा प्रचार व आचारसंहिता यामुळे रस्ते, धरणे, कालवे, बंदरे यांची कामे थोडी सैल पडली होती, त्याचा उत्पादनक्षेत्रास फटका बसला. फर्निचर, कॉम्प्युटर, ऑप्टिकल उत्पादने या क्षेत्रांत उत्तम वाढ झाली. परंतु चर्मोद्योग तसेच अन्य काही क्षेत्रे मागे पडली. केंद्र सरकारने भांडवली खर्चावर प्रचंड भर दिला असून, त्याचवेळी मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्राची भरभराट व्हावी, यासाठी उपाययोजनाही केल्या आहेत. म्हणूनच ऑगस्ट 2023 मध्ये देशाचा औद्योगिक उत्पादनाचा निदेर्शांक (आयआयपी) दहा टक्क्यांवर जाऊन पोहोचला होता. जुलै 2023 मध्ये आयआयपी वाढीचा दर 5.7 टक्के होता. वीज तसेच खाणक्षेत्र यांच्यातील विकास अतिशय गतिमान पद्धतीने झाला होता. केंद्र सरकारने उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत (पीएलआय) वेगवेगळ्या 14 उद्योगक्षेत्रांमध्ये सप्टेंबर 2023 पर्यंत 95 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक नव्याने आकर्षित केली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानेच दिलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत नोव्हेंबर 2023 पर्यंत 746 प्रस्ताव मंजूर करण्यात आले. लाभार्थी कंपन्यांनी 24 राज्यांतील दीडशेहून अधिक जिल्ह्यांमध्ये आपले कारखाने उभारले. या प्रकल्पांमधून 7 लाख 80 हजार कोटी रुपयांची भरघोस उत्पादन/विक्री झाली आणि त्यामधून जवळपास साडेसहा लाख इतक्या लोकांना रोजगार मिळाला. 2022-23 मध्ये या प्रकल्पांकरिता 2900 कोटी रुपये आर्थिक प्रोत्साहने म्हणून वितरितही करण्यात आले होते. गेल्या तीन वर्षांत पीएलआय योजनेमुळे मोबाइल उत्पादनात 20 टक्के वाढ झाली. 2022-23 मध्ये 100 अब्ज डॉलरपेक्षा जास्त मूल्याच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांची निर्मिती होऊ शकली. त्यात 44 अब्ज डॉलर किमतीच्या स्मार्टफोनचा समावेश होता. तर त्यापैकी 11 अब्ज डॉलर मूल्याच्या स्मार्टफोनची निर्यातही झाली. स्वप्ने साकार होतात, ती ही अशी. भारतीय उत्पादनक्षेत्रात पुरेशी 'डेप्थ' नाही, असे मानले जाते. तशी ती असेल, तर विदेशी स्पर्धेचा आपण मुकाबला करू शकतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात दीर्घकाळ टिकणारी अशी स्पर्धात्मकता असेल, तर टप्प्याटप्प्याने मजुरांची वेतनपातळी व उत्पन्नही वाढू शकते. एक अब्जापेक्षा जास्त लोकसंख्येचे जगात भारत व चीन असे दोनच देश आहेत. त्यामुळे भारतात देशांतर्गत बाजारपेठच मोठी आहे. शिवाय जागतिक बाजारपेठांसाठी उत्पादनकार्यात स्वतःला लोटून देणारे अगणित मजूर आपल्याकडे आहेत. मात्र भारत गेल्या तीन दशकांत अनेक आशियाई देशांच्या तुलनेत खूप मागे राहिला आहे. 1990 मध्ये भारताचे उत्पादनक्षेत्र चीनशी टक्कर देऊ शकत होते. परंतु त्यानंतरच्या काळात चीनच्या उत्पादनक्षेत्राचा आकार दहापटीने वाढला आहे, तर भांडवली माल व यंत्रोपकरण क्षेत्रामध्ये चीनने 50 पट वाढ साध्य केली आहे. केवळ रोजगारप्रधान उत्पादनच नव्हे, तर इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार, वीजसामग्री, यंत्रोपकरणे या क्षेत्रांतही चीन उच्च तंत्रज्ञानाचा उत्तम रीतीने वापर करत आहे. याला उत्पादकीय क्षमतेची 'डेप्थ' असे म्हटले जाते. त्यामुळे चीन पाश्चात्त्य देशांशीही स्पर्धा करू शकत आहे. जागतिकीकरणामुळे 1990च्या दशकात जगातला व्यापार व गुंतवणूक वाढू लागली. सर्व देशांना आपापल्या व्यापारी सीमा खुल्या कराव्या लागल्या. त्यामुळे भारत आणि चीन या दोन्ही देशांतील ग्राहकांना विविध देशांतील माल व सेवांचा आनंद घेता येऊ लागला. मात्र, चीनच्या तुलनेत भारतातील देशी उत्पादनक्षेत्र खूपच मागे पडले आहे. 2014 नंतर मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' या मोहिमेला सुरुवात केली. भारताला जगासाठीच्या कारखान्याच्या भूमिकेत (मॅन्युफॅक्चरिंग हब) आणणे, हा त्यामागील हेतू होता. चार वर्षांपूर्वी सरकारने सेमिकंडक्टर बनवणार्या कंपन्यांपासून ते मोबाइल इलेक्ट्रॉनिक्स तयार करणार्या कंपन्यांपर्यंत सर्वांना भरघोस मदत दिली. देशाची उत्पादनक्षमता वाढवण्याचा उद्देश त्यामागे होता. परंतु या मोहिमांना जेवढे यश मिळायला हवे, तेवढे यश अद्याप मिळालेले नाही.बड्या बड्या कारखान्यांच्या कमतरतेमुळे उत्पादनक्षेत्रात भारत अजून जगाच्या पुरवठा साखळीत महत्त्वाचे स्थान मिळवू शकलेला नाही.

पान १ वरून

## बदलापूर प्रकरणाच्या तपासासाठी...

देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळाआधीच बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कारवाईत विलंब करणारे बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत. बदलापूरच्या दुर्दैवी घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे

**अजित पवारांचे बदलापूर प्रकरणावर ट्वीट**

बदलापूरमध्ये शाळेतील चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराची घटना अतिशय दुर्दैवी आणि अत्यंत संतापजनक आहे. या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, कुणालाही पाठीशी घातलं जाणार नाही. या घटनेचा बारकाईने तपास केला जाईल. त्यासाठी आयपीएस अधिकारी आरती सिंह यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी (SIT) स्थापन करण्यात आली आहे. हा अक्षम्य गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांची जराही हयगय केली जाणार नाही. त्या दृष्टिकोनातून या प्रकरणाची चौकशी जलद गतीने व्हावी, याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश ठाणे पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आपल्या लेकींना न्याय मिळालाच पाहिजे, ही माझी ठाम भूमिका आहे.

**देवेंद्र फडणवीस बदलापूर प्रकरणावर ट्वीट**

बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कारवाईत विलंब करणारे बदलापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना दिले आहेत. बदलापूरच्या दुदैवी घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि यात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

# नाजूक कळी कातील नजरेने खुडली

९ ऑगस्ट रोजी कोलकाता येथे एका ३१ वर्षाच्या डॉक्टर मुलीवर त्याच कॉलेज मध्ये पहाटे तीन वाजता अतिशय अमानुष पद्धतीने बलात्कार करून तिची निर्दयी हत्या करण्यात येते आणि त्याच कॉलेजचे प्रमुख हे तिने आत्महत्या केली असे तिच्या घरी सांगतात,

हे दुष्कर्म माणुसकीला
काळीमा फासणारे आहे हे
वाचल्यानंतर प्र. रा.पासे
यांच्या कामुकतेच्या
अधिरतेची मनोविकृती;
मर्द नाही जो करे अशी कृती,
धिक्कार असो या नामर्दतेचा;
कारण हा तर बलात्कार आहे
माणुसकीचा; जनावरांहून
बत्थर आहे ही वृत्ती सदैव
आहे वासना चित्ती,
धिक्कार असो या नपुसंकतेचा हा
तर बलात्कार आहे माणुसकीचा
असे बोलले तरी वावग ठरणार
नाही.

ज्या डॉक्टर मुलीवर बलात्कार करून हत्या केली ती मुलगी ना की तिने शॉर्ट कपडे घातले होते की ना तिने वनपीस घातला होता अस काही नसतना पांढरा रंग जो आपण शांततेचे प्रतीक आहे असा पांढरा रंगाचा फक्त एप्रोन परिधान केला होता पण माणसाच्या हा वासनांध नजरेला ते पण चांगलं दिसलं नाही आणि त्या पांढ्या शुभ्र एप्रोंन चा रंग क्षणार्धात रक्ताच्या रंगाने माखून टाकला ...

यातील सर्वात नालकाय असेल ते हॉस्पिटल प्रशासन कारण त्यांनी तर तिने आत्महत्या केली असे तिच्या कुटुंबाला सांगितले तिच्या शरीरात १५० ग्राम पेक्षा जास्त रींल्ल रद्दु मिळाला आणि हा एका व्यक्तीचा असू शकतं नाही तिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिच्या शरीराचे तुकडे केले एका माणसाचे हे काम असू शकत नाही

पण एक विचार केला तर आपणास असे वाटलं की वासनांध झालेला पुरुष हा कोणत्याही टोकाला जाऊ शकतो. बलात्कार होतो तिची हत्या होते आणि आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला जातो ९ तारखेला घडलेली घटना असताना १६ तारखेला गुन्हा नोंद होतो ही शोकांतिका आहे. देशभर अशा घटना घडत आहेत एखाद्या प्रतिष्ठित किंवा नावाजलेल्या माणसावर असा काही प्रसंग आला तर किंवा अत्याचार झाला तर आंदोलन सुरू होते अगदी बेंबीच्या देठापासून बोंबलणारा अर्णब गोस्वामी आत्ता मात्र कुठे तोंड काळे करून गेला हे दिसत नाही.

कारण गरीबाची मुलगी असणं हे अपराध असेल कदाचित? गरीब मुलीला न्याय मिळू नये का ?न्याय मागण्यासाठी एखादी सेलिब्रिटी हवी आहे का?

कोलकाता मधील डॉक्टर भगिनी आपली कोण लागत नाही का? ती पण आपल्यातीलच आहे कधी काळी आपले सामाजिक न्याय मंत्री अभिनेत्रीच्या घरी जाऊन सुरक्षा देत होते ते आज यावर बोलायला तयार नाहीत National Crime Records Bureau नुसार २०२३ मध्ये ४२८२७८ गुन्हे हे बलात्कार किंवा इतर बाबतीत झाले आहेत मग आपण विचार करू शकतो की आपली माता भगिनी किती सुरक्षित आहे.

मागील दोन वर्षापूर्वी हिंगणघाटच इथे एकतर्फी प्रेमातून हत्या एका महिलेची हत्या केली हे प्रकरण ताजे असताना नंतर लासलगाव येथे एका निष्पाप महिलेस पेटवुन देउन तिला मारण्याचा केलेला प्रयत्न आणि १५ फेब्रुवारी रोजी परभणी मध्ये सेलु येथील ८ वर्षीय अल्पवयीन मुलीवर केलेले अनन्नवीत अत्याचार पाहुन महाराष्ट्रात आणि देशात सद्य स्थितीला महिलांप्रती अतिशय भयावह वातावरण आहे असे वाटते याला जरब बसवण्यासाठी सरकारने आंध्रप्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील दिशा कायद्याप्रमाने कायदा अंमलात आणला पण त्याची योग्य अंमलबजावणी करायला हवी, कारण अशा या नराधमांना शिक्षा फर्मावताना भूतदयेपेक्षाही माणूसकीला प्रथम प्राधान्य देउन शिक्षा सुनावली पाहिजे. एका महिलेस जिवंतपणी मरणयातना दिल्या जातात, एका अल्पवयीन मुलीची अब्रु लूटण्याचा आणि तिचा जीव घेण्याचा अत्याचार राजोरोसपणे होत आहेतच एक मुलगी किंवा महिला त्यानंतर ती सर्वप्रथम एक माणुस आहे याचे भान विसरून एका शर्यतीतील प्राण्याप्रमाणे तिच्या शरीराची विटंबना होत आहे. अशा या विकृत मानसिकतेला जगातील कोणताही समाजाला शांत चित्ताने बसु देणार नाहीच. म्हणूनच बलात्कार,अँसीड हल्ले यातील आरोपींना शिक्षा देताना ज्या काही प्रवृत्तीच्या मनात असे काही वाईट विचार त्यांच्या मनामध्ये घिरट्या घालत असतात, त्यांना एक प्रकारे दहशत घालण्यासाठीचा निकाल लावून द्यायला हवा मग त्यात गुन्हेगार फासावर लटकणे हे एक दुय्यम काम असून तशा प्रकारच्या मानसिकतेला भयभीत करण्याचा उद्दात हेतु साधला गेला पाहिजे.

कारण फाशीची ही शिक्षा आता पुवीसारखी जास्त प्रमाणात दिली जात नाही आणि आता फाशी ही दुर्मिळातील दुर्मिळ गुन्ह्यासाठी राखून ठेवलेली ती शिक्षा आहे. पण हा कट रचुन केलेला गुन्हा एक एका मुलीपुरता किंवा एका महिलेपुरता मयार्दीत नसून,देशातील समाजाचा विश्वास भक्कम पायावर उभ्या ठेवणार्या घटकाच्या मनाला उध्वस्त करून टाकणारा गुन्हा आहे. म्हणूनच अशा गुन्ह्यांसाठीफाशीची शिक्षा झालीच पाहिजे, की ज्यामुळे त्या नराधमांच्या मनाचा थरकाप उडाला पाहिजे. जर अशा नराधम वृत्तीला आपण खात पाणी घातले तर अवघड आहे कारण अजून अशी एखादी घटना घडली तर आपण ही घटना विसरून जाऊ मग पुढचे पाठ आणि मागे सपाट असे आपण होऊ. शेवटी देशातील आणि राज्यातील महिलांप्रती आणि मुलींच्या उज्वल भविष्याला प्रेरणा देणारा निकाल असावा ही एकच अपेक्षा!

**- दत्तात्रय महादेवी**
**पोपट पाचकवडे - पाटील**
चिखर्डे (ता. बार्शी
जिल्हा सोलापूर)

**प्रबोधन**

# हाताचे महत्त्व । ज्यांनी ओळखले

देव दगडाचा केला, पाथरवट त्याचा बाप झाला. देव सोन्याचा केला सोनार त्याचा बाप झाला. देव लाकडाचा केला, सुतार त्याचा बाप झाला! अर्थात, ईश्वराची निर्मिती मानवी हातांनी केली, हा विचार थोर प्रबोधनकर्ते गाडगेबाबा आणि कवी केशवसुत यांनी देव- दानवा नरे निर्मिले असे निर्भयपणे आणि ठामपणे सांगितला. या दोन थोर व्यक्तींपूर्वी त्यांच्यासारखाच कुणी पुरोगामी विचारवंत सुभाषितकार म्हणाला, प्रभाते कर दर्शनम्। अर्थात, सकाळी पहिल्यांदा आपल्या हातांचं दर्शन घ्या. देवी-देवता, पांडुरंग, गणपती, मारुती, दत्तदर्शन; अथवा येशू-रसूल्ललाचं दर्शन घ्यायचंच असेल, तर घ्या, पण त्या अगोदर हातांचं दर्शन घ्या. कारण आपला हात हाच जगन्नाथ आहे. हाताने पैसा मिळवता येतो, विद्या प्राप्त होते, भौतिक सुखांची रेलचेल करता येते, दान देता येतं. दातृत्वाने धन्यता प्राप्त करता येते आणि दुसऱ्यांची सेवाही करता येते. पुरोगामी, समाजनिष्ठ विचारवंत स्वामी विवेकानंद त्यासाठीच म्हणतात, 'दुःखी माणसाला मदत करण्यासाठी पुढे केलेला हात, हा प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त असतो.'

हाताने प्रार्थनाही करता येते आणि सेवाही करता येते. पण प्रार्थना सद्भावपूर्ण असली, तरी ती पोकळ असते, निष्फळ असते. सेवाकार्यासारखी ती भरीवही आणि फलदायकही नसते. विवेकानंदांनी हातांना अधिक सार्थकता मिळावी, याच महान उद्देशाने सनातन्यांच्या रागालोभाची पर्वा न करता हा विचार परखडपणे व्यक्त केला आहे.

देवांची कल्पना करणाऱ्या भाविकांनी देव सामर्थ्यसंपन्न असावा, हे सिद्ध करण्यासाठी कोणा देवाला चतुर्भुज केलं; तर कोणाला अष्टभुज केलं. गीतेच्या विश्वरूपदर्शनातील देवाचे हात तर असंख्य आहेत. पण इतक्या हातांचा उपयोग देवांनी कधी केल्याचं उदाहरण नाही. गरिबांचे पुराच्या पाण्यात वाहून जाणारे संसार चार हात राहू दे, एक हात पुढे करून तरी देवांनी वाचवले का? मुंबईत पोलिसांची ठाणी आहेत तशीच जागृत देवी-देवतांचीही विपुल ठाणी आहेत. पण अतिरेकी हल्ले होण्याआधी त्या विघ्नविनाशक देवांना ते रोखता आलेले नाहीत; आणि हल्ले झाल्यानंतरही ठाणेदार देवांनी हातपाय हलविलेले नाहीत. उलट, देवांच्या तुलनेत दुबळ्या मानल्या जाणाऱ्या पोलीस, डॉक्टर्स, परिचारिका, वाहनचालक, वॉर्डबॉइज यांनी तत्पर सेवा करून जनजीवन सुरळीत केलं. मग देवांची ठाणी, त्यांचे चार, आठ हात, सोळा हात कधी उपयोगाला येणार? देवभक्तीने अंध झालेल्या भाविकांच्या डोळ्यात चिकित्सक बुद्धीचं अंजन घालताना गाडगेबाबा म्हणायचे, 'तुमच्या देवाले आपले अंग धुता येत नाही, तुमच्या देवाले धोतर नेसता येत नाही, तुमच्या देवाले त्याच्या नैवेद्याला भिडलेलं कुत्रं हाकलता येत नाही आणि देवळापुरता उजेडही पाडता येत नाही. मग तो देव काय कामाचा?' अशा देवाला अनेक हात असले काय आणि नसले काय, सगळं सारखंच !

अशा परावलंबी देवापेक्षा स्वावलंबी फेरीवाले, भंगार गोळा करणारे, झाडू कामगार, रखवालदार किंवा रोजंदारी कामगार, हे फार फार श्रेष्ठ आणि वंदनीय आहेत. कारण आपल्या दोन हातांचा ते उपयोग तरी करतात. अशा व्यवसाय करणाऱ्यांना मनुस्मृतीकारांनी ज्ञानी माणसापेक्षा श्रेष्ठ मानलं आहे, हे विशेष. मनुस्मृती म्हणते, ज्ञानिभ्यो व्यवसायिनः श्रेष्ठा। वास्तविक मनुवाद्यांनी महात्मा बसवेश्वरांना छळलं असलं, तरी हाताने काम करणाऱ्यांचा गौरव करण्यात महात्मा बसवेश्वर मनुस्मृतीकाराबरोबरच आघाडीवर आहेत. बसवेश्वर म्हणतात, दोनी हातांनी तू परिश्रम करी। मिळे सर्वांना भाकरी। मोळी मारव्या। हा राजा थोर। श्रम केले त्याने भरपूर। कायक (कष्ट) जो करील, देव तयाला तारील।

गेल्या शतकात Four H Club या नावाची अमेरिकेतील समाजसेवी संघटना खूप लोकप्रिय झालेली होती. त्या संघटनेचा पहिला H हा Hand साठी येई, नंतर Heart, Head आणि Health चा उल्लेख होई, ते एका दृष्टीने ठीकच आहे. कारण आपणही अपना हात जगन्नाथ असं म्हणून हाताचंच महत्त्व स्पष्ट करतो. एक संस्कृत सुभाषितकारही म्हणतात, हस्तोद्यमं विना वक्त्रे प्रविशेन्न कदाचन- अर्थात, पुढ्यात आलेलं अन्न हाताच्या मदतीशिवाय मुखात जाऊ शकत नाही. हातांचा महिमा अगाध आहे. श्रमणाऱ्या हातांनीच जीवन वैभवाला चढते, असं श्रमिक बंधूंवर प्रेम करणारे साने गुरुजीही म्हणतात. गीतेवर गीतारहस्य हा भाष्यग्रंथ लिहून तो भक्तियोग, ज्ञानयोग सांगणारा ग्रंथ नसून त्याचं मुख्य प्रतिपादन कर्मयोग आहे, हे टिळकांनी सांगितलं. पण गीतेच्या कर्मयोगावर आजन्म बडबडणाऱ्या प्रवचनकर्त्यांनी हातांनी आपली नित्य नैमित्तिक कामंसुद्धा कधी केली नसतील. महात्मा गांधी चरखा फिरवताना कर्मयोगावर बोलत म्हणून ते खरे कर्मयोगी होते. देवापुढे सदासर्वदा हात जोडून जे लोक बसतात, ते देवाचे, जन्मठेप झालेले कैदी आहेत. ते स्वकष्टनिर्मित सुखाच्या आनंदाला कायमचे मुकतात, हेच खरं! म्हणून प्रभातकाळी हातांचं दर्शन घ्या आणि त्यांना कामात गुंतवा म्हणजे आयुष्य सार्थकी लागेल! त्यासाठी-

आपल्या हाताला। माना जगन्नाथ
देतसे तो नित्य। हवे ते ते ॥१
कष्टांमध्ये हात। गुंतता सर्वदा
जाताती आपदा। दूर साया ॥२
हाताचे महत्त्व। ज्यांनी ओळखले
सौख्ये नटविले। आयुष्याला ॥३
काम करण्याचा। कंटाळा ज्या हाता
दैन्य दुःख वार्ता। तेथे नक्की ॥४
हातांचा महिमा। भाविका कळेना
कर्तव्य कळेना। आवश्यक ।।५
जोडूनिया हात। जन्म वाया गेला
कल्याणाचा झाला। सत्यानाश ।।६
भक्ती नको। कष्ट बांधवांनो करा
समृद्धीने भरा। जीवनास ॥७
प्रयत्नांची पूजा करा जन्मभर
फिरतसे कर। तेथे सौख्य ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

## दक्षिण सोलापूर विधानसभा...

निवडणुकीत काँग्रेस पक्षास फार मोठे नुकसान सहन करावे लागेल. दक्षिण सोलापूरचे आमदार कै. आनंदराव देवकते हे काँग्रेस पक्षाकरीता सतत झटले आहेत. व काँग्रेस पक्षासाठी ते त्यांच्या मृत्युपर्यंत एकनिष्ठ राहिले आहेत. तरी काँग्रेस पक्षास याबाबत आत्मचिंतन करणे अतिशय गरजेचे आहे. आतापर्यंतच्या झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत अनुकुल वातावरण असूनदेखील काही ठिकाणी धनगर समाजास तिकिट नाकारले गेले आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रातून धनगर समाजाचा एकही खासदार नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व धनगर समाजात प्रचंड नाराजी पसरली आहे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत खासदार प्रणितीताई शिंदे यांना निवडून आणण्यात धनगर समाजाचा सिंहाचा वाटा आहे.

तरी आम्ही गुरुपोर्णिमेच्या रोजीपासून गेल्या महिनाभरात संपूर्ण दक्षिण सोलापूर मतदार संघातील जवळ जवळ ८० ते ९० गावांचा गावभेट दौरा केला व तेथील संपूर्ण धनगर समाज व इतर बहुजन समाज बांधवांशी देखील संवाद साधला. या गावभेट दौयास फारच चांगला प्रतिसाद मिळाला. येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर धनगर समाज व इतर बहुजन समाज बांधवांचा दक्षिण सोलापूर मतदार संघात मध्यवर्ती ठिकाणी महामेळावा आयोजित करणार आहोत व सदर मेळाव्यात एक कमिटी स्थापन करुन ठराव पास करुन पुढील निर्णय जाहिर करुन शिष्टमंडळाव्दारे काँग्रेस पक्षश्रेष्ठींना निवेदन देण्यात येणार आहे. तरी धनगर समाजातील गरीबातील गरीब अशा उच्चशिक्षित (डॉक्टर, वकिल, इंजिनिअर) निष्ठावंत कार्यकर्ता व अशा तरुण सुशिक्षित उमेदवारास उमेदवारी देण्यात यावी अशी धनगर समाजाच्या वतीने मागणी आहे.

तरी येत्या विधानसभा निवडणुकीत दक्षिण सोलापूर मतदार संघातून धनगर समाजासच उमेदवारी देण्यात यावी असे आजच्या पत्रकार परिषदेत धनगर समाजाचे आंदोलक सिद्राम चोपडे, अप्पाराव हाके व रावसाहेब व्हनमाने यांनी म्हटले.

सदर पत्रकार परिषदेस सिद्राम चोपडे, अप्पाराव हाके, रावसाहेब व्हनमाने, राजु बल्लारी, राम शिनीवडीयार, प्रा. देवेंद्र मदने, कल्याणी कोकरेसर उपस्थित होते.

## आज भारत बंदची हाक...

उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली होती, ज्यामध्ये विभागीय आयुक्त, जिल्हा दंडाधिकारी आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. पश्चिम उत्तर प्रदेश हे विशेषतः संवेदनशील क्षेत्र म्हणून ओळखले गेले आहे आणि हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

आरक्षण बचाव संघर्ष समितीने या आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन सर्व व्यापारी मंडळांना केले आहे. बाजार समित्यांकडून मात्र अजून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे ते या आंदोलनात सहभागी होणार की नाहीत याबाबत कोणतीही माहिती पुढे आलेली नाही. बंदमुळे सार्वजनिक वाहतूक आणि खासगी क्षेत्रातील कामकाजात व्यत्यय येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रुग्णवाहिका व रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवा सुरू राहणार आहेत.

भारत बंद दरम्यान सरकारी कार्यालये, बँका, शाळा, महाविद्यालये आणि पेट्रोल पंप सुरू राहणार आहेत. वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी, सार्वजनिक वाहतूक, रेल्वे सेवा आणि वीजपुरवठा यासह आपत्कालीन सेवा सुरू राहतील.

१ ऑगस्ट रोजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने ६:१ च्या बहुमताने निर्णय दिला की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे आणखी उपवर्गीकरण करण्यास परवानगी दिली जाऊ शकते.

**भारत बंदविषयी संपूर्ण माहिती**

१) नॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ दलित अँड आदिवासी ऑर्गनायझेशनने (नॅकडाओआर) हा निकाल मागे घेण्यासह मागण्यांची यादी जाहीर केली आहे.

२) या निर्णयामुळे अनुसूचित जाती आणि जमातींच्या घटनात्मक अधिकारांना धोका निर्माण झाला आहे, असा युक्तिवाद करत केंद्र सरकारने हा निर्णय 'फेटाळावा', असेही संघटनेने म्हटले आहे.

३) अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांना 'न्याय व समता'; आरक्षणाबाबत संसदेचा नवा कायदा; केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती/जमाती/ओबीसींची जातनिहाय आकडेवारी जाहीर करणे; उच्च न्यायपालिकेत या गटांना ५० टक्के प्रतिनिधित्व देण्याचे उद्दिष्ट; केंद्र/राज्य सरकारच्या नोकऱ्यांमधील बॅकलॉग रिक्त पदे भरणे, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम.

४.) किमान तीन राजकीय पक्षांनी बंदला पाठिंबा दर्शविला आहे. यामध्ये बसपा, झामुमो आणि राजद यांचा समावेश आहे.

## मी पण एक मुलगीच आहे...!!!


भीती वाटते मुलगी म्हणून जगताना...
बदलणारा महाराष्ट्र बघताना...
इथे दिवसाढवळ्या माझ्यावरती हल्ला होतं असतो
पण वाचवायला मात्र कुणीच पुढे नसतो....
पहात राहतात लोक मला तडफडून मरताना...
पण दिसत नाही कोणीच मदतीचा हात धरताना....
कसं जगायचं या महाराष्ट्रामध्ये जर नसेल सुरक्षित मी....
याचा कधीच विचार करत नाही कोणी....
मुलगी म्हणून जन्माला येण वाटतं तेवढं सोपं नसतं
शेवटी ज्याच त्यालाच समजत असतं...!!
इथे दररोज तोंड बांधून फिरावं लागतं
प्रत्येक वेळी त्याचं कारण फक्त ऊनच नसतं...!!
भीती वाटते मला पण या वाईट जगाची...
कारण इथे लाज नाही कोणालाच कोणाची....
दररोज बातमीमध्ये माझं नाव असतं...
जग पण नेहमी माझीच चूक काढत असतं...
का विचार करत नाही कोणी माझ्या बाजूने
मी पण एक मुलगीच आहे नाही कोणी वैरी...
कुटुंबाला सांभाळणारी ही मीच..
संसार सावरणारी ही मीच.. मुलांना घडवणारी ही मीच..
प्रत्येकाच्या सुखदुःखाला समजून घेणारी देखील मीच...
एवढ्या सगळ्या भूमिका पार पाडूनही मीच कुठेतरी कमी पडते...!!
मुलगी म्हणून जन्माला आले कदाचित इथेच तर चुकते..!!!
सगळ्या संकटांना सावरून शेवटी माझी मलाच उठायचं आहे मुलगी
म्हणून जन्माला आले याचा मला नेहमी अभिमान आहे...!!



**प्रेरणा विकास गायकवाड**
बी कॉम भाग १
शंकरराव मोहिते महाविद्यालयात, अकलूज

# ५ कोटी ८५ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल बाळराजे पाटील यांचा पंचक्रोशीच्या वतीने फेटा बांधून सत्कार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकीय क्षेत्रामध्ये सर्वसामान्यांसाठी कार्यरत राहून विकासाचे प्रश्न मार्गी लावणारेच यशस्वी होत असतात. केवळ राजकीय आकस आणि द्वेष भावनेतून विकासाला आडवे जाणाऱ्या व्यक्तींना सर्वसामान्य जनता ही सहजरीत्या ओळखते. अरबळीसारख्या केवळ सातशे मतांच्या गावाने आजवर राष्ट्रवादीची विचारधारा जपत सातत्याने विकासासोबत राहण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे या गावासाठी रस्ते आणि अन्य सुविधांसाठी पंधरा कोटीपेक्षा जास्त निधीची विकास कामे पूर्ण होत असल्याची बाब निश्चितपणे या पंचक्रोशीच्या वतीने अभिमानास्पद असल्याचे उद्गार लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांनी काढले. अरबळी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन बाळराजे पाटील यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अरबळी ग्रामपंचायतीसाठी सामाजिक न्यायमधून काँक्रिटीकरण, पेवर ब्लॉक बसवणे, गावांतर्गत रस्ता करणे, अण्णाभाऊ साठे नगर रस्ता काँक्रिटीकरण, अंतर्गत गटार या कामांचे यावेळी भूमिपूजन करण्यात आले.



**ग्रामस्थांच्या वतीने सत्कार**

ना.अजित पवार यांच्या सहकार्यामुळे आमदार यशवंत माने यांच्या माध्यमातून अरबळी ते इंचगाव रस्ता काँक्रिटीकरणासाठी ६ कोटी १४ लाख, अरबळी ते घोडेश्वर रस्ता काँक्रिटीकरणासाठी ५ कोटी ८५ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल यावेळी बाळराजे पाटील यांचा पंचक्रोशीच्या वतीने फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

## वात्रटिका

### भाड भाड गुरूजी

भिड नव्हती, भाड नव्हती
भेटून भाड भाड बोलून गेले...
नेहमी प्रमाणे गुरूजी पुन्हा
आ बैल म्हणत वादात अडकले...
आधी नावाजले, कौतुक केले
अचानक यु टर्न कसा घेतला...
वादग्रस्त आहेत कायम ते,
तोच वसा त्यांनी जोपासला...

**हणमंत पडवळ,**
**धाराशिव,**
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सिंहगड पब्लिक स्कूल केगाव सोलापूर येथे 78 वा स्वातंत्र्य दिन 'मेरी माटी मेरा देश ' हे अभियान राबवून उत्साहात साजरा करण्यात आला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिंहगड पब्लिक स्कूल केगाव येथे 78 वा स्वातंत्र्य दिन 'मेरी माटी मेरा देश' हे अभियान राबवून उत्साहात आणि जोशात साजरा करण्यात आला. 'मेरी माटी मेरा देश' हे अभियान म्हणजे आपल्या जन्मभूमीच्या अभिमानाच्या उत्कृष्ट आदशार्चे स्मृतिचिन्ह आहे, या अभियानासाठी प्रत्येक विद्यार्थ्यानें आपापल्या घरून माती आणून त्याचा संग्रह केला. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती जागृत व्हावी यासाठी शाळेमध्ये वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते .त्यामध्ये हाऊस नुसार मार्च पास्ट , डान्स तसेच एक अनोखा उपक्रम म्हणून बस डेकोरेशन अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विशेष म्हणजे प्रत्येक मुलांनी आपापल्या बसचे डेकोरेशन लक्षवेधी केले होते. बस डेकोरेशन मध्ये प्रथम क्रमांक बस नंबर १०, द्वितीय क्रमांक बस नंबर ७ व तृतीय क्रमांक बस नंबर ४ ने पटकावला. मार्च पास्ट स्पर्धेमध्ये मध्ये प्रथम क्रमांक ग्रीन (कलाम) हाऊस, द्वितीय रेड (रमण) हाऊस, तृतीय यलो(विक्रम) हाऊस व चतुर्थ क्रमांक ब्ल्यू (होमी) हाऊस ने पटकावला.डान्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक ग्रीन (कलाम)हाऊस, द्वितीय यलो(विक्रम), हाऊस तृतीय रेड (रमण) हाऊस व चतुर्थ क्रमांक ब्ल्यू (होमी) हाऊस ने पटकावला. सर्व विजेत्यांना आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले सर व उपस्थित मान्यवर सी.आर.टी. डी.चे डायरेक्टर डॉ. एस.एच. पवार, सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज ॲडमिन चे उपप्राचार्य डॉ. एस.एम.जगदे, अकॅडेमिक चे उपप्राचार्य डॉ. आर.टी. व्यवहारे, इस्टेट मॅनेजर डॉ. दत्तात्रय नवले यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

या सर्व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले सर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच शाळेच्या प्राचार्या निखहत शेख व उपप्राचार्य प्रकाश नवले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# रक्षाबंधन निमित्त प्रभाग 22 येथे रंगला गुलाबी रंगांचा सोहळा

## लाडकी बहिणीने मानले अजित पवारांचे आभार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रक्षाबंधन निमित्त इच्छा भगवंताची मित्रपरिवार यांच्या वतीने सामूहिक रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नुकतेच राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत राज्यातील प्रत्येक महिलांच्या बँक खात्यात तीन हजार रुपये रक्षाबंधन निमित्ताने जमा केले यानिमित्त लाडक्या बहिणीने अजित पवार यांच्या प्रतिमेला राखी बांधून त्यांचे कृतज्ञता पर आभार मानले. राष्ट्रवादी काँग्रेसने विधानसभेची तयारी सुरू केली आहे लोकसभेसारखे विधानसभेला अपयश पदरात येऊ नये यासाठी राष्ट्रवादीने नवीन निवडणूक रणनीतीकार नेमला आहे अजित पवारांनी जाहीर केलेले लाडकी बहिण योजना आणि राष्ट्रवादीकडून गुलाबी रंगाचा सुरू झालेला वापर याकडे याच दृष्टिकोनातून पाहिलं जात आहे. पिंक कॅम्पेनची सर्वत्र चर्चा सुरू असून याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २२ येथील रामवाडी यूपीसी सेंटर येथे रक्षा बंधन निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री व्हावे यासाठी लाडक्या बहिणीने यावेळी अजित पवारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित महिलांनी गुलाबी रंगाचा साडी परिधान केले होते तर इच्छा भगवंताची परिवाराकडून उपस्थित महिलांना गुलाबी रंगाचा ब्लाउज पीस देऊन ओटी भरण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थित महिलांनी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव यांना राखी बांधून औक्षण केले. अजितदादा ने दिलेला शब्द पाळला लाडक्या बहिणीच्या बँक खात्यामध्ये रक्षाबंधन अगोदरच तीन हजार रुपये जमा झाले त्यानिमित्त सोलापुरातील लाडक्या बहिणीने अजित पवारांचे आभार मानले व अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत अशी अपेक्षा देखील उपस्थित महिलांनी व्यक्त करत त्यांना शुभेच्छा दिल्या असल्याचे यावेळी किसन जाधव म्हणाले. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सप्टेंबर महिन्यापर्यंत रामवाडी हॉस्पिटल आदिशक्ती देवी मंदिर विजापूर नाका दोन नंबर झोपडपट्टी शिवानंद किराणा दुकान येथे शिबिर ठेवण्यात आले असून याचा लाभ देखील उपस्थित महिलांनी घ्यावे असे आव्हान देखील यावेळी जाधव यांनी केले.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, महिला पदाधिकारी सायरा शेख, शशिकला कसपटे, शोभा गायकवाड, संगीता गायकवाड, प्रमिला बिराजदार, प्रमिला स्वामी, रंजना गायकवाड, उमेश जाधव, कुमार जाधव,ऋतिक गायकवाड, निलेश कांबळे, किरण शिंदे, अभिजीत कदम, महादेव राठोड, माणिक कांबळे, वसंत कांबळे,अमोल जगताप, सागर कांबळे, संतोष गायकवाड, माऊली जरग,अभिषेक हावणेकर, पवन बेरे, अंकित सरवदे, रामलिंग क्षत्रिय, डॉ. अनिल पवार, डॉ. शिल्पा शेट्टे,रिना गायकवाड, यास्मिन पठाण, सत्यभागा शिवशरण, अश्विन कोळी, सरोजिनी जाधव, लक्ष्मी आठवले, पूनम जाधव, रेखा गायकवाड, स्वप्नाली मोरे, सोनाली कारंडे, जाईबाई जाधव, राजश्री नंदी, कोलमट वेदिका कार्यकारी स्वाती कोळी, हनुमान शिंदे, निसर्ग मित्र मनोज देवकर, सरिता पवार,ललिता पवार, विजया, कांबळे, पूजा राठोड, लक्ष्मी कांबळे, नाझिया शेख, शिपा शेख, सुप्रिया शेख,अश्विनी जाधव, सुवासिनी गायकवाड, तनुजा गायकवाड, सुजाता रसाळ, प्रांजली गवळी, चंद्रकला वाघमारे, आकाश मुसे, रुपेश गायकवाड, संतोष माने, श्रीपाद नारायणकर, राजेंद्र हावळे आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित महिलांना इच्छा भगवंताची मित्र परिवाराकडून मिठाई वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इच्छा भगवंताची मित्र परिवाराने परिश्रम घेतले.

# विधानसभा निवडणुकीपूर्वी मोहोळ शहर आणि तालुक्यातील विविध प्रशासकीय कार्यालयातील स्थानिक कर्मचाऱ्यांची बदली अन्यत्र करण्याची मागणी



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** येत्या काही महिन्यावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मोहोळ शहर आणि तालुक्यातील विविध प्रशासकीय कार्यालयातील स्थानिक कर्मचाऱ्यांची बदली अन्यत्र करण्याची मागणी सर्वसामान्यतून केली जात आहे. येथील विविध शासकीय कार्यालयात स्थानिक कर्मचारी प्रवास खर्च वाचवण्यासाठी नियमांना बगल देऊन कार्यरत आहेत. मोहोळ तहसील कार्यालयातदेखील अप्रत्यक्षरीत्या स्थानिक कर्मचारी तळ ठोकून आहेत. अशा महसूल आणि पोलीस प्रशासनातील कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी विशेष माहिती मागवून आचारसंहिता अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वीच त्यांना अन्यत्र बदलून पाठवणे गरजेचे आहे.

मोहोळ येथील प्रशासकीय कार्यालयात प्रशासकीय कमी आणि राजकीय वातावरण जास्त असते. हेच निवडणुकीत निवडणुकीच्या कामाचे कारभारी असतात. त्याप्रमाणे मोहोळ शहर आणि तालुक्यातही कागदोपत्री बाहेरचे असलेले मात्र अप्रत्यक्षरीत्या राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात सक्रिय बनलेले काही स्थानिक कर्मचारी शासकीय नियमांना बगल देत एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. जर येत्या काळात होणाऱ्या निवडणुकांनी पक्ष आणि पारदर्शक कार्यप्रणालीने पार पाडावयाच्या असतील तर मोहोळ शहरातील विविध प्रशासकीय कार्यालयात नियुक्त असलेल्या स्थानिक कर्मचाऱ्यांना मतदारसंघाबाहेर आत्ताच बदलून पाठवण्याची गरज आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकणी, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे या जिल्ह्याच्या तीन अतिवरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोहोळ तालुक्यातील निवडणूक काळात प्रत्यक्षरीत्या आणि अप्रत्यक्षरीत्या मोहोळ येथे स्थानिक बनलेल्या त्या कर्मचाऱ्यांची पडताळणी करून त्यांना अन्यत्र नियुक्त करणे गरजेचे आहे. अन्यथा निवडणुकीतील त्यांचा राजकीय हस्तक्षेप निवडणूक निरीक्षकांच्या नजरेतून सुटणे अशक्य होणार आहे.

निवडणूक कालावधीमध्ये जरी ग्रामविकास विभागाची भूमिका म्हणावी तशी परिणामकारक नसली तरी पोलीस आणि महसूल मधील कर्मचारी निवडणूक काळात गमती जमती करू शकतात. मोहोळ तालुक्यात अनेक मंडल अधिकारी आणि तलाठी त्याचबरोबर अनेक पोलीस नाईक गेल्या अनेक वर्षापासून इथेच कार्यरत आहेत. विशेष म्हणजे मोहोळ तहसील कार्यालयात देखील निवडणुकीचे काम हाताळणारे अनेक कर्मचारी शहर आणि तालुक्यातीलच रहिवाशी आहेत. निवडणूक काळात हेच कर्मचारी विविध महत्त्वाचे विभाग हाताळत असतात. त्यामुळे त्यांच्याकडून पारदर्शक आणि तटस्थ प्रक्रिया पार पडणे जवळपास अशक्य असते.

मोहोळ तालुक्यात वरकमाईच्या सोन्याचा धूर निघत असल्याने या ठिकाणी बदलून येणे आणि कायम इथेच सेवेत कार्यरत राहणे याबद्दल अनेकांना आकर्षण असते. बरेच कर्मचारी शासकीय कमी आणि राजकीय घटकांशी जास्त संबंधित आहेत. निवडणुकीच्या काळात हेच निवडणूक प्रक्रियेत आकंठ बुडालेले असतात कारण हे सेवेत असतात. काही जणांचा प्रशासकीय कालावधी संपला नसला तरी ते मोहोळ तालुक्याच्या राजकीय आणि इतर निवडणूक विषयक घडामोडीशी संबंधित असल्यामुळे त्यांना अन्यत्र बदलून पाठवणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

# फिनिक्स इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** बहीण भावाच्या अतूट नात्याची, प्रेमाची जपणूक करणारा सण म्हणजे रक्षाबंधन.आज देशभरात सर्वत्र मोठ्या उत्साहाने हा सण साजरा केला जातो.बहिण भावाचा हा सण लवंग २५/४ येथील फिनिक्स स्कूलच्या चिमुकल्यानी मोठ्या उत्साहात साजरा केला.

मुलींनी स्वतः आपल्या हाताने फुले, लोकर, रेशमी धागे, कापूस, रंगीत तांदूळ, मनी अशा गृहपयोगी वस्तूंचा वापर करून शाळेतील भावांसाठी अतिशय सुंदर मनमोहक अशा राख्या बनवून आपल्या भावाचे तोंड गोड करीत मनगटावर राख्या बांधल्या तर भावांनीही आपल्या बहिणींसाठी चॉकलेट्स, पेन्सिल, पेन, बांगड्या, टिकली पॉकेट देऊन भावाचे कर्तव्य बजावण्याची परंपरा जोपासली. या उपक्रमामुळे मुलींच्या सुप्त गुणांना वाव मिळाला. कार्यानुभव अंतर्गत मुलींच्या कलेला संधी मिळाली मुलींनी स्वतः राख्या बनविल्यामुळे मुलींच्या चेह-यावर वेगळाच आनंद दिसत होता हा उपक्रम राबविण्यासाठी फिनिक्स इंग्लिश स्कूलच्या संस्थापिका, अध्यक्षा नूरजहाँ शेख, गुलशन शेख, तमन्ना शेख यनी परिश्रम घेतले व पालक संघाचे उपाध्यक्ष महादेव कोळेकर यांनी विदयार्थ्यांना पेढे वाटून या रक्षाबंधनाचा गोडवा वाढवीला.

# महर्षी मार्कंडेय महामुनी यांच्या चरणी अजितदादा मुख्यमंत्री व्हावे याकरीता राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांचे साकडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोमवारी नारळी पौर्णिमेच्या दिनी महर्षी मार्कंडेय महामुनी यांचा दरवर्षीप्रमाणेच रथोत्सव अतिशय उत्साहात जल्लोषात निघत असतो सोलापूर शहर जिल्हा आणि राज्यभरातून लाखो पद्मशाली भाविक या रथोत्सवात सहभागी होत असतात. त्यानिमित्ताने आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जेष्ठ नेते प्राध्यापक श्रीनिवास कोंडी त्यांचे नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान हे आपल्या पदाधिकारी सहकाऱ्यांसह महर्षी मार्कंडेय महामुनी महाराजांच्या मंदिर येथे पुजन आरती करून नतमस्तक होत सोलापूर शहरात सुख समृद्धी आणि शांती नांदो त्याचबरोबर अजितदादा हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान यांनी साकडे घातले.

सोलापूर शहरात जल्लोषात निघणाऱ्या महर्षी मार्कंडेय महामुनी रथोत्सव आरतीस सहभागी होऊन पालखीचे देखील दर्शन घेतले. पद्मशाली समाजाचे अध्यक्ष सुरेश फलमारी व समस्त समाज बांधवांना जल्लोषात संपन्न होणाऱ्या रथोत्सवाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने वतीने शुभेच्छा दिल्या. पद्मशाली समाजाचे युवक अध्यक्ष शेखर कमटम पद्मशाली नाती संस्थेचे विश्वस्त सिद्धेश्वर आंबट श्री तोगडवीर क्षत्रिय समाज युवक संघ अध्यक्ष दत्तात्रय बडगंची यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष संतोष पवार अध्यक्ष जुबेर बागवान यांचा मंदिराच्या कार्यालयात सत्कार केला.

याप्रसंगी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव सोशल मीडिया शहर - जिल्हाध्यक्ष वैभव गंगणे , प्रकाश मोटे यांच्यासह इतर सर्वच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# दहीहंडी फोडणाऱ्या संघास मिळणार तब्बल ५ लाखांचे पारितोषिक

## सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनची दहीहंडी : सोलापूर जिल्ह्यातील ठरणार सर्वात मोठे पारितोषिक






संस्कृती बालगुडे
(सिने अभिनेत्री)



धनश्री काडगांवकर
(सिने अभिनेत्री)

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी उत्सवात दहीहंडी फोडणाऱ्या संघास तब्बल ५ लाख एक रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. सोनाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड आणि स्वयंशिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

गुरुवार २२ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता जुळे सोलापूर येथील डी फार्मसी कॉलेज शेजारी असलेल्या भंडारी ग्राउंडवर दहीहंडी उत्सवाचा हा कार्यक्रम होणार आहे. या स्पधेर्चे उद्घाटन माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार राम सातपुते यांच्या हस्ते होणार आहे. तर आमदार आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याचबरोबर सिने अभिनेत्री संस्कृती बालगुडे आणि धनश्री काडगावकर यांचीही विशेष उपस्थिती या कार्यक्रमास असणार आहे.

सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनच्या दहीहंडी उत्सवास सोलापूर शहर जिल्ह्यासह ठाणे, मुंबई, बारामती, पुणे येथील गोविंदा पथकदेखील येणार आहेत. ९ थरांच्या पथकास एक लाख रुपये, ८ थरांच्या पथकास ५० हजार रुपये तर सात थरांच्या पथकास २५ हजार रुपयांचे पारितोषिक सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनतर्फे देण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस काशिनाथ भतगुणकी उपस्थित होते.

**प्रथमच मोठी दहीहंडी**

तब्बल ५ लाख रुपयांचे बक्षीस असलेली मोठी दहीहंडी प्रथमच सोलापुरात आयोजित केली जात आहे. सोनाई फाऊंडेशन व स्वयंम शिक्षा फाऊंडेशनने या दहीहंडी उत्सवाची जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यामुळे या दहीहंडी उत्सवात मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होणार आहेत. ९ थरांची दहीहंडी पाहण्यासाठी सोलापुरातील अबालवृद्धांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सोनाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड आणि स्वयंशिक्षा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ वैद्य यांनी केले आहे.

# बार्शी नगरपरिषद, बार्शी

## (स्थापत्य विभाग)

जा.क्र.स्थापत्य/४८३४
नगरपरिषद कार्यालय,
बार्शी, दिनांक- २०/०८/२०२४

### जाहिर निविदा-१ (२०२४-२५)

१) बार्शी नगरपरिषद खालील नमुद कामाकरिता बंद लखोट्यातून खालील निविदा मागवित आहे. निविदापत्रके दि. २८/०८/२०२४ रोजी दु. ४-०० वाजेपर्यंत स्थापत्य विभागाकडे विकत मिळतील दि. २९/०८/२०२४ रोजी दुपारी ४-०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके नागरी सुविधा केंद्र कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रकमेपोटीचे रकमेचा धनाकर्ष (डि. डि.) व्दारे स्विकारणेत येईल. रोख रक्कम भरणा करून घेतली जाणार नाही. धनाकर्ष सोबत असलेशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दि. ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर निविदाधारकांसमोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) उघडणेत येतील. बंद लखोट्यावर ज्या त्या कामाचे नाव लिहावे. निविदा २ पाकिट पध्दतीने स्विकारल्याजातील पाकिट क्र.१ बयाणा रकमेचा धनाकर्ष (डी. डी), आयकर पॅन नंबर, जीएसटी, ईपीएफ, १ वर्षाचे आयटी प्रमाणपत्र, तसेच ३ लक्षच्या आतील कामास परिशिष्ट - अ प्रमाणपत्र ( र.रु. १०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख ( र.रु.१०० चे स्टॅम्पवर) आणि ३ लक्षच्या वरील कामास परिशिष्ट - अ प्रमाणपत्र ( र.रु.५०० चे स्टॅम्पवर), सत्य प्रतिज्ञालेख ( र.रु.५०० चे स्टॅम्पवर), तसेच महाराष्ट्रशासनाचे सार्व. बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्यावर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र रिनिव्हल असणे आवश्यक आहे.. तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी -२०१७/प्र.क्र. ८ / इमा-२ दि. २०/०५/२०२१ अन्वये १० लक्ष (सर्व कर अंर्तभूत करुन) रकमेवरील कामेई-निविदा पध्दतीचा अवलंब करणेबाबतच्या सुचना देणेत आलेल्या आहे.तसेच पाकिट क्र.२ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दराची निविदा मंजुर करणे अथवा नामंजुर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. निविदा मागणी अर्जासोबत स्वत: ठेकेदाराने हजर राहून किंवा प्रतिनिधी नेमणूक केलेबाबतचे संमतीपत्र त्यांचेकडे देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राक्कलन रक्कम | बयाणा रक्कम रु. | निविदा किंमत | सुरक्षित ठेव | कामाची मुदत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषदेकडील विविध प्रकारची रंगाची कामे करणे. (मालमजुरीसह) | १०,००,०००/- | १०,०००/- | ५९०/- | बिलातून ४% | १ वर्ष | ७ व वरील |
| २ | शहरातील विविध भागातील धोकादायक/ वाळलेली झाडे-झुडपे, फांदया तोडणे. | १०,००,०००/- | १०,०००/- | ५९०/- | बिलातून ४% | १ वर्ष | ७ व वरील |
| ३ | सण व उत्सव साजरे करणेकामी मंडप व्यवस्था व इतर अनुषंगिक कामे करणे (मालमजुरीसह) | १०,००,०००/- | १०,०००/- | ५९०/- | बिलातून ४% | १ वर्ष | ७ व वरील |

टिपः- वरील अ.नं.१ ते ३ कामे ही न. पा. निधीमधुन प्रस्तावीत केली असुन जसजसी वित्तीय तरतुद उपलब्ध होतील तसतसी बिले अदा केली जातील याची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
बार्शी नगरपरिषद, बार्शी